# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/१५१/२०१०/ दिनांक :

श्री. आईस कंपनी,
अ/३०, चिंचोळी, एम.आय.डी.सी.
सोलापूर. — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, सोलापूर

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभागीय कार्यालय, सोलापूर

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण उप विभाग क्र. १, सोलापूर — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. पांडुरंग फुलचंद खडोलिया, प्रोप्रा. श्री.आईस कंपनी तर्फे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार मंचाकडे दि. २७.६.२०१० च्या पत्रासोबत दि. १६.६.२०१० ची तक्रार मंचाकडे दि. ९.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

श्री. आईस कंपनी ही वितरण कंपनीचे ग्राहक आहेत. त्याचा क्र. ३३१५१९०५२०७० HT 1 N- IND आहे. प्रस्तुत ग्राहकाचे मे २००८ मध्ये सिझनल कंझ्युमर टॅरिफ प्रमाणे बिलींग होत होते.

१ जून २००८ मध्ये टॅरिफ बदलाचे परिपत्रक अस्तित्वात आले. त्यांनी दि. २५.६.२००८ रोजी अधीक्षक अभियंता, सोलापूर यांच्याकडे कॅटेगरी सिझनल ऐवजी नॉन– सिझनल करणेबाबत अर्ज दिला. त्यांना अधीक्षक अभियंता यांचेकडून दि. १४.८.२००९ रोजी पत्र क्र. ५९५२ अन्वये जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र हजर करण्यास कळविले. तक्रारदार ग्राहकाने जिल्हा उद्योग केंद्राकडून दि. १२.११.२००९ रोजी Continuous Process Industry बाबतचे प्रमाणपत्र दि. २४.११.२००९ रोजी मंडल कार्यालय सोलापूर येथे हजर केले. अधीक्षक अभियंता, सोलापूर मंडल यांनी तक्रारदारास टॅरिफ बदलाचे पत्र क्र. १२४७ दि. १६.२.२०१० ने Seasonal Category ऐवजी HT 1 N Industrial असा दर संकेत बदलून दिल्याचे कळविले.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर येथे दि. ८.४.२०१० ला परिशिष्ट क्ष मध्ये तक्रार दाखल केली, त्यामध्ये दि. २५.६.२००८ रोजी कॅटेगरी बदलाचा अर्ज दिल्याच्या तारखेपासून दर संकेत बदलून मिळावा अशी मागणी केली. अंतर्गत कक्षाने दि. ११.५.२०१० ला तक्रारदार व वितरण कंपनीचे म्हणणे ऐकून सक्षम अधिकारी अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, सोलापूर यांनी जिल्हा उद्योग केंद्र सोलापूरचे प्रमाणपत्र दिलेल्या तारखेपासून म्हणजे दि. १९.११.२००९ पासून कॅटेगरी – दर संकेत बदलण्या करीता मंजुरी दिलेली आहे ती योग्य आहे असे आदेश दिले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचाकडे दाखल केले. त्यामध्ये तक्रारदार यांनी मार्च २००७ मध्ये नवीन कनेक्शन घेतले त्यावेळेस दर संकेत HT 1 N – Industrial हा होता. त्यांचा उद्योग एम.आय.डी.सी. जागेत आहे आणि जिल्हा उद्योग केंद्राशी (DIC)मध्ये नोंदणीकृत आहे, व H.T. ( High Tension ) सदरात येतो. आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ HT-I : HT Industry ची व्याख्या (Definition) वर भर दिला आहे.

This category includes consumers taking 3 phase electricity supply of High Voltage for industrial purpose.

त्यामध्ये DIC कडून Seasonal / Non Seasonal, Continuous / Non Continuous असे कुठल्याही प्रकारच्या प्रमाणपत्राबद्दल उल्लेख नाही. त्यामुळे तक्रारदाराचे म्हणण्यानुसार असे पत्र आणण्यास सांगणे म्हणजे टोलवाटोलवीचा प्रकार आहे. विद्युत कायदा २००३ प्रमाणे आणि एम.ई.आर.सी. आणि महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २०.१.२००५ नुसार तक्रारदार यांनी दिलेल्या दि. २४.६.२००८ च्या पत्रानुसार Second Billing Cyrcle मध्ये नवीन दर संकेत लागू होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यानंतरची आजपर्यंतची सर्व बीले दुरुस्त करुन मिळावीत. तक्रारदाराने आपल्या तक्रारीत अंतर्गत पान क्र. ५ वर १.६.२००८ पासून नवीन टॅरिफ अस्तित्वात आले त्यामध्ये ASC आकारणी करण्यास एम.ई. आर.सी.ने मनाई केली, तसेच स्थिर आकार ( Demand Charges ) पूर्वीच्या ५०% (Rs/ 1.50 p/u.) केले. त्यामुळे कारखाना पूर्ण १२ चालविणे शक्य झाले, म्हणून पुन्हा दरसंकेत HT 1 N-IND पूर्ववत करावा ही मागणी २४.६.२००८ रोजी केली. त्या दिनांकापासून दर संकेत बदलाचे आदेश वितरण कंपनीस द्यावेत अशी मागणी केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी सुरुवातीस दि.४.७.२००९ रोजी कॅटेगरी HT 1 N to HT II seasonal बदलून मिळण्याबाबत अर्ज केला होता.

परंतु दि. १३.७.२००७ ते १४.२.२००८ या कालावधीमध्ये तक्रारदार यांची वीज जोडणी थकबाकीसाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद असल्यामुळे तक्रारदार दरसंकेत मिळण्यास पात्र होवू शकले नाहीत व दि.१.६.२००८ पासून दर संकेत बदलल्यामुळे त्यांना दि. १२.११.२००९ पासून त्याप्रमाणे दर संकेत लावावेत असे आदेश अंतर्गत कक्षाने दिले आहेत.

प्रस्तुतची तक्रारीची सुनावणी ऊर्जा नगर, सोलापूर येथे घेण्यात आली. तक्रारदार स्वत: हजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. आर.एम. वाघ, सहाय्यक लेखापाल, मंडल कार्यालय, सोलापूर उपस्थित. तक्रारदार श्री. खडलोया यांनी मा. विद्युत आयोगाचे मंजुरीने दि. १.६.२००८ पासून बदललेल्या दर संकेतानुसार दि. २४.६.२००८ ला अर्ज कॅटेगरी बदलण्यासाठी अर्ज केला, कारण ए.एस.सी. चार्जेस वसूल करण्यास बंद आली. ( Demand Charges ) पूर्वीच्या ५०% कमी करण्यात आले. त्यामुळे कारखाना १२ महिने चालू ठेवणे शक्य झाले, त्यासाठी अर्ज केला. तक्रारदाराचे मुख्य म्हणणे की, अंतर्गत कक्षाने दि. १२.११.२००९ पासून दिलेले दर संकेत बदल योग्य आहेत, परंतु त्यांनी अर्ज दिलेल्या तारखेपासून म्हणजे दि. २४.६.२००८ पासून अंमलबजावणी व्हावी. १५ महिन्याच्या उशिराबद्दल वितरण कंपनीने कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार Second Billing Cycle पासून effect द्यावा त्यासाठी दि. २०.१.२००५ पासून नोटीफिकेशन तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र परत मागणे योग्य होईल काय ? पूर्वी दिलेले सर्टीफिकेट रेकॉर्डवर आहे. यामुळे तक्रार मंजूर करावी व योग्य ते आदेश व्हावेत अशी मागणी केली.

वितरण कंपनीतर्फे श्री. आर.एम. वाघ, सहाय्यक लेखापाल यांनी अधीक्षक अभियंता यांचे मंजुरीने व जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र हजर केल्यानंतर दर संकेत बदलून दि. १२.११.२००९ पासून देण्याचे आदेश अंतर्गत कक्षाने दिलेले आहेत, त्यामुळे तक्रार फेटाळण्यात यावी असे प्रतिपादन केले. तसेच तक्रारदार यांनी वारंवार कॅटेगरी बदलाचे अर्ज केले आहेत अशी पुष्टी जोडली. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

मुद्दा क्र. १) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचे दि. २४.६.२००८ अर्जापासून Second Billing Cycle मध्ये दर संकेत बदलून देण्याचे आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

उभय बाजूंचे लेखी कथन व मंचासमोर मांडलेले म्हणणे, अंतर्गत कक्षाचेदि. १०.५.२०१० चे आदेश पहांता, सक्षम अधिक़ारी, मंडल कार्यालय, सोलापूर यांनी जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र दिलेल्या तारखेपासून म्हणजे दि. १९.१२.२००९ पासून दर संकेत बदलण्यास दिलेली मंजुरी योग्य आहे असे आदेश अंतर्गत कक्षाने दिलेले आहेत. परंतु दि. २४.६.२००८ पासून दर संकेत बदलून न देण्याचे कारण दिलेले नाही. त्यामुळे मंचासमोर प्रश्न उपस्थित होतो की, तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्याच्या दि.२४.६.२००८ च्या अर्जाच्या तारखेपासून Second Billing Cycle मध्ये दर संकेत बदलून देणे आवश्यक व जरुरी होते काय ? याची तपासणी करावी लागेल. त्यासाठी तक्रारदाराने मंचासमोर हजर केल्याप्रमाणे कृती मानके विनियम २००५ मधील नियम ९.२ या तरतुदीकडे लक्ष वेधले असता त्याचा आशय खालील प्रमाणे –

Any change of name or change of tariff category shall be effected by the Distribution Licensee before the expiry of the second billing cycle after the date of receipt of application.

सक्षम अधिकारी यांनी जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर यांचे प्रमाणपत्र दिलेल्या तारखेपासून म्हणजे दि. १९.११.२००९ पासून दर संकेत बदलण्या करीता मंजुरी दिलेली आहे. कृती मानकातील तरतूद पहांता, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र असणे आवश्यक नाही किंवा अशा प्रमाणपत्राच्या उपलब्धतेनंतर दर संकेत बदलणे योग्य होईल असे म्हणता येणार नाही, कारण ही बाब कृती मानकातील नियम ९.२ च्या तरतुदीच्या विसंगत आहे. सक्षम अधिकारी अधीक्षक अभियंता किंवा अंतर्गत कक्षाने तक्रारदाराचा दि. २४.६.२००८ चा अर्ज आल्यानंतर देयकाचे दुसरे चक्र संपण्यापूर्वी दर संकेत मंजुरीचे आदेश देणे जरुरी होते. वि.प.ने जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र दिल्यानंतर दर संकेतात बदल केले, अर्जाच्या तारखेपासून का नाही ? या बद्दल कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे अर्जात मागणी केल्याप्रमाणे व कृती मानके विनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज दिलेल्या दिनांकापासून देयकाचे दुसरे चक्र संपण्यापूर्वी दर संकेत बदलून द्यावा लागेल. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे

२) वितरण कंपनीने तक्रारदाराचे मूळपत्राचे दिनांकापासून दि. २४.६.२००८ पासून कृती मानके विनियम २००५ मधील ९.२ च्या तरतुदीनुसार दुसऱ्या बिलींग चक्रामध्ये दर संकेत बदल करावेत व फरकाची रक्कम ग्रहकाच्या पुढील बिलात समायोजित करावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष